माहिती हवीय?


रविकांत साखरे, जामखेड.

□ राज किरणने नायक, खलनायक म्हणून भूमिका केलेले चित्रपट कोणते? नायिका व दिग्दर्शक कोण?

– *कागज की नावः* नायिका सारीका, दिग्दर्शक बी. आर. इशारा, *शिक्षाः* नायिका सुषमा वर्मा, दिग्दर्शक एस. रामनाथन. *बम्बई का महाराजाः* नायिका सारीका, दिग्दर्शक शिबू मित्रा, मनोकामना, नायिका मधू कपूर, दिग्दर्शक केदार कपूर, *मान अभिमानः* नायिका रामेश्वरी, दिग्दर्शक हिरेन नाग. *नजराना प्यार काः* नायिका नीता मेहता, दिग्दर्शक एस. एम. *सागर पतिताः* नायिका शोमा आनंद, दिग्दर्शक आय. व्ही. सस्सी. *साजन मेरे मैं साजन कीः* नायिका रामेश्वरी, दिग्दर्शक हिरेन नाग. *यह कैसा इन्साफः* नायिका सारिका, दिग्दर्शक दासरी नारायण राव, *बसेराः* नायिका पूनम धिल्लाँ, दिग्दर्शक रमेश तलवार. *बुलंदीः* नायिका किम, दिग्दर्शक ईस्माईल श्रॉफ, *कारणः* नायिका शोभा आनंद, दिग्दर्शक बी. आर. इशारा, *लडाकूः* नायिका सारीका, दिग्दर्शक दिनेश-रमेश, *नाखुदाः* नायिका स्वरूप संपत, दिग्दर्शक दिलीप नाईक, *बेजुबान* नायिका रिटा भादुरी, दिग्दर्शक बाबू. *फर्ज और कानून* नायिका रती अग्निहोत्री, दिग्दर्शक के. राघवेंद्र राव. *जोश* नायिका सारीका, दिग्दर्शक राज सिप्पी. *प्यार में सौदा नही* नायिका सारिका, दिग्दर्शक संतोष सरोज, *स्टार* नायिका रती अग्निहोत्री, दिग्दर्शक विनोद पांडे. *तेरी मांग सितारों से भर दूंः* नायिका पद्मिनी कोल्हापूरे, दिग्दर्शक राज खोसला, *वक्त वक्त की बातः* नायिका सारिका, दिग्दर्शक संतोष सरोज. *अर्थः* नायिका शबाना आझमी, दिग्दर्शक महेश भट्ट. *चटपटीः* नायिका स्मिता पाटील, दिग्दर्शक व्ही. रविंद्र. *हम से ना जीता कोईः* नायिका शोमा आनंद, दिग्दर्शक शिबू मित्रा. *कौन है वहः* नायिका माधवी, दिग्दर्शक कमर नारवी. *मजदूरः* नायिका रती अग्निहोत्री, दिग्दर्शक रवी चोप्रा. *सून मेरी लैलाः* नायिका दीपिका, दिग्दर्शक चंदर बहल. *घर एक मंदिरः* नायिका शोमा आनंद, दिग्दर्शक के. बापय्या, *हिप हिप हुर्रेः* नायिका दीप्ती नवल, दिग्दर्शक प्रकाश झा. *सरदारः* नायिका किम, दिग्दर्शक ए. सलाम. *आज का दौरः* नायिका शोमा आनंद, दिग्दर्शक के. बापय्या. *आंधी तुफान*(पाहुणा कलाकार), दिग्दर्शक बी. सुभाष अर्जुन, नायिका सुप्रिया पाठक, दिग्दर्शक राहुल रवैल. *फासलेः* नायिका निकीता शहा, दिग्दर्शक यश चोप्रा. *तेरी मेहरबानीयाँः* नायिका स्वप्ना, दिग्दर्शक विजय रेड्डी. *बेगानाः* नायिका दीप्ती नवल, दिग्दर्शक अंबरिश संगल. *चंबल का बादशहाः* नायिका स्वप्ना, दिग्दर्शक एस. दिनेश. *दुर्गा मां*(पाहुणा कलाकार), दिग्दर्शक के.एस.रेड्डी. *इल्जामः* नायिका श्रद्धा वर्मा, दिग्दर्शक शिबू मित्रा. *राजू*(छोटा रोल), दिग्दर्शक प्रमोद चक्रवर्ती, *गोराः* नायिका प्रीती सप्रू, दिग्दर्शक देश गौतम. *जागो हुआ सवेराः* नायिका शोमा आनंद, दिग्दर्शक शौकत जनाली. *खूनी महलः* नायिका शोमा आनंद, दिग्दर्शक मोहन भाकरी. *मेरा लहूः* दिग्दर्शक वीरेंद्र भट्टाचार्य. *तेरा करम मेरा धरमः* दिग्दर्शक के. के. रेड्डी. *वो दिन आयेगाः* नायिका कोमल महु आकार दिग्दर्शक सत्येन बोस. *चरणों की सौगंधः* दिग्दर्शक के. बापय्या, *बंधन बाहों काः* नायिका स्वप्ना, दिग्दर्शक गोविंद मुनीस. *घर आखिर घर हैः* दिग्दर्शक पवनकुमार. *घुंघटः* नायिका नीता मेहता, दिग्दर्शक सतपाल बग्गा. *हत्याः* दिग्दर्शक कीर्तीकुमार. *प्यार का मंदिरः* नायिका शोमा आनंद, दिग्दर्शक के. बापय्या. *सिलाः* नायिका प्रिया तेंडूलकर, दिग्दर्शक बी. आर. इशारा. *वारिसः* दिग्दर्शक रविंद्र पोपट या चित्रपटात राज किरणने कधी नायक, कधी खलनायक तर कधी सहनायक अशा भूमिका केल्या.

अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

□ परेश रावल यांनी आजवर कोणकोणत्या चित्रपटांतून सहाय्यक भूमिका केल्या आहेत? त्यापैकी त्यांचे गाजलेले चित्रपट कोणते?



सरदारमध्ये परेश रावल

– परेश रावलने अगणित चित्रपटात सहाय्यक भूमिका केल्या आहेत. जागेअभावी त्या सर्वांची यादी येथे देणे शक्य नाही. *अर्जुन, सर, मोहरा, अंत, राजा, हेराफेरी, चाची ४२०, सरदार* हे त्यांचे गाजलेले चित्रपट.

अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

□ 'जाने बहार हुस्न तेरा बेमिसाल है...' हे गीत तसेच 'जा रे बदरा कारे कारे बदरा...' ही गीतं कोणत्या चित्रपटांतील? संगीतकार कोण?

– 'जाने बहार हुस्न तेरा बेमिसाल है...' हे गीत *प्यार किया तो डरना क्या* चित्रपटातील आहे. संगीतकार रवी आणि 'जा रे बदरा कारे कारे बदरा...' हे गीत *बहाना* चित्रपटातील आहे. संगीतकार मदनमोहन.

अनामिका, पुणे.

□ *जोगन* या जुन्या हिंदी चित्रपटाची नायिका नरगीस नेमकी कोणत्या कारणासाठी जोगन बनली? दिलीपकुमार आणि नरगीस अभिनित *हलचल*मधील नेमक्या कोणत्या दृश्यावर सेन्सॉरने बंदी घातली होती?

– *जोगन*मध्ये नरगीस जीवनात आलेल्या वीरक्तीमुळे जोगन बनते. *हलचल*च्या कोणत्याही दृश्यावर सेन्सॉरने बंदी आलेली नव्हती. चुंबनाचा आभास निर्माण करणाऱ्या छायाचित्रांमुळे या चित्रपटाचे पोस्टर त्या काळात चांगलेच वादग्रस्त ठरले होते.

मनोज निवास कामत, कोल्हापूर.

□ शर्मिला टागोर, हेमामालिनी, मुमताज, आशा पारेख, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन आणि संजीवकुमार यांना कोणकोणत्या चित्रपटांसाठी फिल्मफेअर पुरस्कार मिळाला?

– शर्मिला टागोर - *आराधना*, हेमामालिनी - *सीता और गीता*, मुमताज - *खिलौना*, आशा पारेख - *कटी पतंग*, राजेश खन्ना - *आनंद, सच्चा झूठा, आविष्कार*, अमिताभ बच्चन - *आनंद, नमक हराम, अमर अकबर ॲन्थोनी, डॉन, हम* आणि संजीवकुमार - *शिकारी, अर्जुन पंडित, आंधी.*